सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज....१९६....ठ. क्र....१....
दि..४/४/१८........रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सोलापूर शहर भुयारी गटार योजना अंतर्गत स्थापत्य कामासाठी प्रस्तावात नमूद कारणास्तव जाहिर प्रसिध्दिकरणाने प्राप्त झालेल्या तीन निविदा धारकांपैकी (मक्त्याची रक्कम रुपये १७४,३८,४५,९८२/-) सर्वात कमी दराचे निविदाधारक दास ऑफ़शोअर इंजि.प्रा.लि., नवी मुंबई यांचेकडून त्यांनी निविदेत दिलेले मक्त्याच्या रकमेपेक्षा २.७० % कमी दराने सदरचे काम करुन घेणेस, त्यांचे नांवे मक्ता मंजूर करणेस, करार करणेस, वर्कऑर्डर देणेस, येणारे खर्चास व सदरचा खर्च - अमृत अभियान (मलनिस्सारण) - या स्वतंत्र बजेट हेड मधून करणेस तसेच सध्या स्थायी समिती सभापती निवडणूकीची बाब न्याय प्रविष्ठ असल्याने मा. स्थायी समिती गठीत झालेली नाही, अश्या परिस्थितीमध्ये अशी समिती गठीत होईपर्यंत मुं. प्रां. महा. अधिनियम १९४९ चे कलम ७३ ( क ) या मा. स्थायी समितीचे अधिकार मुं. प्रां. महा. अधिनियम १९४९ चे कलम ३५ ( अ ) अन्वये मा. सर्वसाधारण सभेस असल्याने प्रस्तुत मक्ता मंजुरीस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १४/०३/२०१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.१९१ ठ. क्र.......२
दि.१०/४/१८ रोजी झालेल्या सभेत खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला. १९१

सोलापूर शहरातील सार्वजनिक/ शासकीय ठिकाणी, खाजगी मिळकतीवर इ. ठिकाणी जाहिरात करणेकरीता स्मार्ट सिटी अंतर्गत नेमलेले जॉन्स लॉग लासाल्ले प्रॉपर्टी कन्सलटंट (इंडिया) या कंपनीने सादर केलेले जाहिरातीचे दराबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सोलापूर शहराचे नांव स्मार्ट सिटीमध्ये समाविष्ठ झालेने त्यास अनुषंगून जे.एल.एल.कंपनी यांनी सोलापूर शहराचे निरिक्षण करुन सादर करणेत आलेले तपशील प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) मधील १) खाजगी जागेवरील, २) शासकीय/निमशासकीय जागेवरील,३) स्ट्रीट पोल वरील, ४) बस स्टॉप वरील,५)रस्त्याच्या दुभाजकावरील जाहिरातीबाबतचे सुचविलेले दरास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस्तव व सदरचे दराबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी तसेच अनाधिकृत लावणेत आलेल्या फलकधारकावर कारवाई करणे,तसेच सोलापूर शहरामध्ये नो-डिजीटल झोन वगळून जे.एल.एल.यांच्या मार्फत डी.पी.आर.मधील जाहिराती धोरण सोलापूर शहरासाठी लागू करणेस त्या अनुषंगीक परवाना देणे,नाकारणे,दंडात्मक कारवाई करणे,वेळोवेळी मा.शासनाकडून झालेल्या निर्देश/आदेशाप्रमाणे कार्यवाही ठेवणे तसेच मा.न्यायालयाकडून होणा-या निर्देशानुसार कार्यवाही ठेवणे व धोरणामध्ये दुरुस्ती करणेबाबतचा सर्व अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती मार्फत मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणेकामी मा.आयुक्त यांचे दि.९/२/१८चे टिपणीने आलेल्या प्रकरणास मान्यता मिळणेकामी मा.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत येत आहे. तसेच आजअखेर अनेक डी.पी.आर.प्रमाणे कामे करण्याचे प्रयत्न करण्यात आले असून,डी.पी.आर.नुसार काम करुनही उत्पन्न मात्र डी.पी.आर.प्रमाणे म.न.पा.स मिळत नाही.म्हणून डी.पी.आर.तयार करणा-या एजन्सीला उत्पन्नाबाबतही जबाबदारी करारपत्रात करण्याच्या अटीवर मान्यता द्यावी. प्रकरणी मा. स्थायी समिती ठराव क्र. २९२, दिनांक २८-२-१८ चे शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज ९ ९ २ ठ. क्र......३
दि..६।४।१८...रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत क्रिडा कार्यालयाकडील जलतरण तलावकरिता मंजूर झालेले र.रु. २६.७० लाख या शासकीय निधीतून आंतरराष्ट्रीय दर्जाचे डयुराफ्लेक्स / मॅक्झीफ्लेक्स डायव्हिंग स्प्रिंग बोर्ड बसविणे कामासंबंधी प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. २ र.रु. १९,३६,१४४/- यास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ६-२-२०१८ चे टिपणीप्रमाणे मा.स्थापत्य समिती ठ.क्र.२०० दि.१५-०३-२०१८ अन्वये मा. मनपा कडे शिफारस करणेकामी आलेल्या प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. १९३ ठ. क्र. ८ दि. ६/८/१८ रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मा. मनपा ठ.क्र. ११८ दि. १९-७-२००८ अन्वये ग.व.सु. व द.व.सु. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम, नागरी दलितवस्ती सुधारणा, जिल्हा नियोजन विकास प्रकल्प अंतर्गत मा. आमदार, मा. खासदार सूचवितील ती कामे नमूद आहे. आजला त्यास बराच कालावधी झालेला असून, केंद्र शासन व मा. शासनाकडील विविध योजनेतील,अनुदानातील कामे तातडीने मुदतीत होणे आवश्यक असते ते अन्यथा अनुदान परत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर कारणास्तव उपरोक्त ठरावमध्ये नमूद व्यतिरिक्त, केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडील सर्वच विविध योजनांचे कामे, तसेच जिल्हा नियोजन समितीकडील विविध कामाचे पूर्वगणनपत्रकास अंतिम मान्यता देण्याचे अधिकारही मा. स्थापत्य समितीकडे सोपविणे आवश्यक असल्याने ही सभा मा. स्थापत्य समितीस विविध कामाचे पूर्वगणनपत्रकास अंतिम मान्यता देणेचे अधिकार देणेकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.स्थापत्य समिती ठ.क्र.२०३ दि.१५-०३-२०१८ चे शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ ११८ ठ. क्र........५
दि..6/8/18.....रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



मा.महापौर व मा.सदस्य श्री. अमर पुदाले यांनी संयुक्त चौक ते आरकाल हॉस्पिटल या दरम्यान जूनी ब्रिटीश कालीन सहा इंची ड्रेनेज लाईन खराब झाल्याने ते त्या ठिकाणी मोठया व्यासाचे नवीन ड्रेनेज लाईन टाकणेचे काम हे मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अंतर्गत काम करणेबाबत पत्र दिले होते. त्या अनुषंगाने पुर्वगणनपत्रक क्र.८४ सन २०१७-१८ र.रु.४९,०३,६९३/- चे एस्टीमेटस तयार करण्यात आले आहे. सदरचे काम सन २०१७-१८ चे भांडवली कामे ड्रेनेज लाईन घालणे व गटारी बांधणे मधील उपलब्ध तरतूदीतून खर्ची टाकणेस मा.सर्वसाधारण सभेचे मान्यतेस्तव मा.आयुक्त यांचे दि.२८-०२-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(signature) P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.९५ ठ. क्र.........
दि. ०१/८/१८ ......रोजी ठेवता झालेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



आरोग्य खात्याचे अन्न व परवाना विभागाकडून महाराष्ट्र प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ अन्वये ४५३ खालील अनुसुचि विभाग १८ भाग १ ते ४ मध्ये नमुद केलेल्या सुचिनुसार परवाने दिले जातात. परंतु व्यवसाय सुचि मर्यादित असल्याने सोलापूर महानगरपालिकेच्या अत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून परवाना उपविधीतील नियम क्र.२ ई मध्ये दुरुस्त करुन सुचिमध्ये नविन ५२ व्यावसायांचा समावेश करणेकरीता आलेल्या प्रस्तावास मान्यता देणेकामी मा.आयुक्त यांचे दि.१३-०३-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ज९५८ ठ. क्र. ८ दि. १०/४/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला

नगर पथ विक्रेत्यांचे सर्व्हेक्षण मक्तेदारास वर्कऑर्डर देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव राष्ट्रीय उपजिविका अभियाना अंतर्गत फेरीवालांना अर्थ सहाय्य या बजेट मधून सन २०१७-१८ करिता २४१४ फेरीवाल्याच्या सर्व्हे करुन आयडेटी द्यावयाची आहे. सदर सर्व्हेक्षणाकरिता र.रु. ३०१७५०/- व आयडेटी करिता र.रु. ६०,३५०/- शासन निधी उपलब्ध आहे. तथापि प्रत्यक्ष उद्दिष्ट अंदाजे ९५११ याप्रमाणे शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यास याच दराने सर्व्हेक्षणाचे काम व ओळखपत्र वाटप करणे बंधनकारक राहील. प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. १ ने मुख्यलेखापरिक्षकाकडून आलेल्या आक्षेपाची पूर्तता केलेली आहे. संदर्भ क्र. २ ने करारपत्राचा मसुदा विधान सल्लागार यांचेकडून तपासून आलेला असून त्याप्रमाणे करारपत्र तयार करुन घेणेस, नगर पथ विक्रेता फेरीवाला समिती नेमलेली असून, नगर पथ विक्रेता सर्व्हेक्षणाचा मक्ता ओर्यासिस टेक्नॉलॉजी यांना मंजूर झालेला विषय सदर समिती समोर ठेवणेस तसेच सदर संस्थेस वर्कऑर्डर देणेस, करारपत्र करुन घेणेस व वर्क ऑर्डर मुदतीत स्थायी समिती समोर सादर करणेस परंतू स्थायी समिती अस्तित्वात नसलेने मा. सर्वसाधारण सभेपुढे पाठविणेस तसेच याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १८-३-१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...१९८...ठ. क्र........
दि...६/८/१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जुळे सोलापूर येथील मनपा मालकीच्या जुना स.नं. ३२० त्यासी न.स.नं. १२४ पैकी पाण्याच्या टाकी जवळील दोन खोल्या जुळे सोलापूर पोलीस चौकीसाठी विना मोबदला वापर करणेस देणेबाबत तसेच या अनुषंगीक पुढील योग्य ती कार्यवाही मा. आयुक्त यांचे स्वाक्षरीने करणेस, अधिकार देणेस, मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २०-३-२०१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदरच्या जागेच्या बाबतीत निर्णय घेणेसाठी खालील प्रमाणे समिती नियुक्त करणेत येत आहे.

१) मा. महापौर

२) मा. सभागृह नेता

३) मा. विरोधी पक्षनेता

[signature]
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.......ठ. क्र.......
दि.............रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सन २०१६-१७ सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत कामातून जुना प्रभाग क्र. ३८ साईबाबा चौक सामल घर ते भंडारी घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे या कामाऐवजी प्र.क्र. ३८ साईबाबा चौक गुर्रम घराजवळील रस्ता कॉंक्रीटने करणे या कामाचे बदलास व याकामी तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र. १/२०१६-१७ र.रु. ३,८६,६९१/- इतक्या रकमेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २३-२-१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क.ज. २०७ ठ. क्र. ९० दि. ०१/८/१८ रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



शहरातील विविध प्रभागातील सार्वजनिक शौचालय पे ॲंड युज तत्वावर चालवण्यासाठी देणेस मान्यता मिळणेबाबत प्रस्तावात नमुद कारणास्तव पे ॲंड युज तत्वावर ना नफा ना तोटा या पध्दतीने सुरुवातीस कांही २० सीट एकत्रीत असलली शौचालये चालविणेस द्यावयाची आहेत. त्यानंतर त्यास मिळणारा प्रतिसाद पाहून टप्या-टप्याने शहरातील सर्व शौचालय पे ॲंड युज तत्वावर स्वयंसेवी संस्था/सहाकारी सेवा संस्था/सफाई कामगार संस्था/महिला बचत गट अथवा अशा प्रकारचा कामाचा अनुभव असणा-या व्यक्ती यांच्या कडून स्वारस्य मागणीपत्र ( Letter of intrest) घेणे करीत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीकरण देऊन विहित नमुन्यात अर्ज व पुराव्याची कागदपत्रे मागवून संस्थेस अथवा व्यक्तीस सार्वजनिक शौचालय वापरणा-या व्यक्ती कडून १/- रुपये (एक रुपये) शौचालय वापर शुल्क म्हणून स्विकारणेस, अतिरिक्त शुल्क आकारल्यास कायदेशीर कारवाई करणेबाबत तथापी सार्व. शौचालय स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असून प्रथमतः केवळ नमुद ३३ ठिकाणे या तत्वावर चालवायची असून त्याप्रमाणे मान्यता मिळणेबाबत सदरची बाब धोरणात्मक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे मंजूरीस्तव मा.आयुक्त यांचे दि.०७/११/२०१७ चे टिपणीचे अवलोकन केले.महानगरपालिकेच्या वतीने आरोग्याच्याबाबतीत अनेक मोफत योजना राबविल्या जातात. त्यामुळे यासाठी नागरीकांकडून पैसे घेणे इष्ट होणार नाही. स्वच्छ भारत योजना अभियाना अंतर्गत म.न.पा.चे निधीमधून सदरची योजना राबविणेत यावी. पूर्वी प्रमाणेच नागरीकांसाठी मोफत व्यवस्था ठेवणेत यावी. मा.म.न.पा. ठराव क्र. ९१, दिनांक १२-२-२०१८ अन्वये निर्णय घेण्यात आला. त्यास अनुसरुन प्रकरणी सदर ३३ ठिकाणे पे ॲंड युज तत्वावर देणेबाबत फेर विचार होणेकामी मा.म.न.पा.सभेकडे प्रस्ताव सादर करणेबाबत मा. आयुक्त यांचे दिनांक ७-११-२०१७ व दि. २७-३-१८ च्या टिपणीप्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव

अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२०२८. क्र........९९
दि..०१/४/९५.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण मंडळाकडे लिपीक पदावर कार्यरत असलेले श्री. काशिनाथ बिराजदार यांची कन्या कु. सुप्रीया काशिनाथ बिराजदार हीची एमपीएससी परीक्षेतून उत्तीर्ण होऊन (जेएमएफसी) न्यायाधीश प्रथमस्तर पदी निवड झाल्याबद्दल सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांचा सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यास व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. २०३ ठ. क्र. १२
दि. ६/४/९८ ...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील प्लॉट नं. सी/१३/बी एमआयडीसी अक्कलकोट रोड, सोलापूर याचे मालक देविदास जक्कन असून सदर मिळकतीवरील कर व नळाची आकारणी ही घरगुती दराने करणेबाबत वेळोवेळी अर्ज देऊनही सन २००१ पासून नळाची आकारणी ही कमर्शियल दराने येत आहे. सदर नळाचे बिल हे घरगुतीदराने देणेबाबत सन २००३ पासून पत्रव्यवहार करुनही आजअखेर त्यावर कोणतीच कार्यवाही प्रशासनाने केलेली नाही. त्यामुळे नाहक नळाचे कर कमर्शियल दराने भरावे लागत आहे. सोबत जोडलेल्या सर्व कागदपत्राची पाहणी केली असता सदर नळाचे बिल घरगुती दराने देणे योग्य वाटते. तरी अर्जदाराने दिलेल्या अर्जाच्या दिनांकापासून नळाचे बिल घरगुती दराने आकारणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 208 ठ. क्र. 93
दि. 10/4/18 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

२०४

श्री. पाशा अ. गनी पठाण, राहणार प्लॉट नं. ३२, केशव नगर झोपडपट्टी, सोलापूर यांच्या मुलीचे लग्न दिनांक १० एप्रील २०१८ रोजी होणार असून, त्या अगोदर लग्नाचे साहित्य खरेदी करुन त्यांच्या घरामध्ये ठेवण्यात आले होते. सदर घरास अचानकपणे आग लागून सर्व संसारोपयोगी व लग्नाचे साहित्य जळून खाक झालेले आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असून, पुन्हा त्यांना लग्नाचे साहित्य खरेदी करणे इतकी त्यांची आर्थिक परिस्थिती नाही. तरी श्री. पाशा अ. गनी पठाण यांना सोलापूर महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 200 ठ. क्र. 98 दि. 01/8/18 ....रोजी ठेवला खालील प्रमाणे ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



एनएचएआय अंतर्गत सोलापूर शहरातील फ्लायओव्हर सेक्शन १ व सेक्शन २ यांच्या रस्ता रुंदीच्या अलाईनमेंट प्रमाणे प्रस्तावित आर.ओ.बी.रस्ता योजना नुसार अस्तित्वाचे रस्त्याचे रुंदीत वाढ होत त्या भागातील रस्त्याचे क्षेत्रात वाढ करुन प्रस्तावात डि.पी. रस्ता करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदल करणे बाबत जाहिर प्रसिध्दीरणानंतर प्रप्त झालेल्या नागरिकांच्या सुचना व हरकतीमध्ये बहुतांश विरोध दिसून येतो. तसेच सुनावणीसही विरोध दिसून आला. तथापी, अनुषंगाने नियमानुसार घेतलेल्या सुनावणीच्या अनुषंगाने जागा मालकांच्या प्रस्तावित बदलास विरोध असल्याने व संपूर्ण उड्डाणपुलाचे प्रकल्पाचा अंदाजे ७०० कोटी रुपये खर्च NHAI करणार असल्याने प्रकरणी मान्यतेस्तव मा. आयुक्त यांचे दि.१४-०३-२०१८ टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मुमुलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१५५ ठ. क्र....१५
दि.१०/४/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१५५

अंध, अपंग, मूकबधिर व कर्णबधीर यांना शहरासह शहर हद्दीबाहेर २० कि.मी. परिघक्षेत्रात बसमार्गाच्या शेवटच्या टप्यापर्यंत मोफत बस प्रवासाची सोय उपलब्ध करुन देणेस व प्रती लाभार्थी प्रतीवर्षी रु.७,२००/- इतके अनुदान सोलापूर महानगरपालिकेकडून धोरणात्मक निर्णय होणेकामी मा.परिवहन समिती यांचे शिफारशीने मा.सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव सादर करणेस, मा.सहा.आयुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांचे दि.१२/१२/२०१७ चे टिपणीप्रमाणे मा. सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव सादर करणेस मा. परिवहन समिती ठराव क्र. ५३, दिनांक ३०-१२-२०१७ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मुदतलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१५८ ठ. क्र.....९५
दि..२४/४/१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९ नुसार कामकाज करण्याकामी मा. आयुक्त यांचे कार्यालयीन आदेशामध्ये नमूद अधिका-यांच्या नावाखाली दर्शविलेल्या विभागाचे कामकाज सोपविण्यात येत असलेबाबत मा. आयुक्त यांचेकडील जा.क्र.नआ/वै/३१४, दिनांक ६-१-२०१८ चे कार्यालयीन आदेशाची माहिती, मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव ठेवणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ६-१-२०१८ चे कार्यालयीन आदेशाचे अवलोकन केले.

मा.आयुक्त यांचे दि.६-१-२०१८ चे कार्यालयीन आदेशाचे माहिती घेतली. परंतु या आदेशातील नमुद नगर सचिव कार्यालय व मुख्यलेखापरिक्षक कार्यालय हे मा.महानगरपालिका व मा.स्थायी समितीच्या अधिपत्याखाली आहेत. हे दोनही खाते वगळून मा. आयुक्त यांचे दि. ६-१-१८ चे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

(signature) P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.नं.१५९..ठ. क्र....२५
दि..२०।४।१८..राजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१५९

श्री. पाटील सुर्यकांत सदाशिव, सभागृह नेता सोलापूर महानगरपालिका यांनी दिनांक ०६-०१-२०१८ रोजी पत्र देऊन माझी प्रकृती ठीक नसल्यामुळे माहे डिसेंबर २०१७ पासून मनपा सर्वसाधारण सभेस तीन महिन्याच्या कालावधीसाठी अनुपस्थीत राहणेकामी परवानगी मिळणेस विनंती केली आहे. दरम्यानच्या काळात माझी प्रकृती ठिक झाल्यास मी नियमितपणे सभेस उपस्थित राहणार आहे. असे कळविले आहे. त्यानुसार प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ११ नुसार श्री. पाटील सुर्यकांत सदाशिव, सभागृह नेता, यांचे दि. ०६-०१-१७ चे पत्राप्रमाणे मा. सर्वसाधारण सभेसमोर निर्णयास्तव ठेवणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ९-०१-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६०.ठ. क्र....९८
दि..१०।४।९८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. गणेश शिंदे वय वर्षे २२ रहाणार आसरा सोसायटी ५७/अ शहाघर सोलापूर यांचे वडील माजी सैनिक असून श्री. गणेश शिंदे यांचे शिक्षण एस.एस.सी. आयटीआय असे झाले असून त्यांचे एन.सी.सी. ट्रेनिंग झाले आहे तसेच ते जिमनॅस्टीक असून रेम्बो सर्कसमध्ये विविध पात्री ट्रेनिंग टिचर व घोडा रेसर याचा त्यांना अनुभव आहे. आता दि ग्रेट खली यांचे नेतृत्वाखाली कॉन्टीनेटल रेसलिंग एंटायरमेंटमध्ये जालंधर पंजाब येथे एक वर्षासाठी ट्रेनिंगसाठी निवड होऊन प्रवेश मिळाला असून ते पुढे वर्ल्स रेसलिंग एंटारमेंट म्हणून अमेरिकेला जाणार आहेत. यासाठी वार्षिक ५ लाख रु. फी व खर्च आहे. तीन वर्षाच्या कोर्ससाठी १५ लाख खर्च येणार आहे. श्री. गणेश शिंदे यांची घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असून वडील माजी सैनिक असून त्यांच्या आईचे कॅन्सरच्या आजाराने निधन झाले आहे. तरी श्री गणेश शिंदे यांना अमेरिकेत रेसलिंगचे प्रशिक्षण घेण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याबाबत निर्णय घेणेकामी मा.महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/साधारण/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ १६९ ठ. क्र........९९
दि. २०/०४/१८...रोजी ठेवला असलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



**अ)** सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठयाअंतर्गत उजनी ते सोलापूर दुहेरी पाईप लाईन टाकणेचे कामाचे र.रु. ६९२/-कोटीचे प्रस्तावापैकी नमूद टप्पा क्र. १ अंतर्गत र.रु. ५२६.१५/- कोटीचे काम प्रस्तावित करुन सदरहू योजनेसाठी एन.टी.पी.सी. कडून सी.आर.सी फंडमधून मिळणारे र.रु. २५०/- कोटी व स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन कडून मिळणारे र.रु. २०० कोटी असे रक्कम रुपये ४५०/- उपलब्ध होणार असलेने जादा लागणारे र.रु. ७६.१५ कोटीची तरतूद मनपा निधीतून करणेस व सदरचे काम सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांचेमार्फत करणेस, त्याअनुषंगाने एन.टी.पी.सी. कडून टप्याटप्याने रक्कम उपलब्ध करुन घेऊन ते स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडे हस्तांतरीत करणे तसेच याअनुषंगाने शासनाकडे निधी उपलब्धतेसाठी व मनपा हिस्सा उपलब्ध करणेसाठी, आवश्यकतेप्रमाणे शासनमान्य संस्थेतून सॉप्ट लोन मिळविणेसाठी कार्यवाही ठेवणेस व त्याप्रमाणे प्रकरणी आवश्यक तो पत्रव्यवहार करणे यासाठी संपूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना देणेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी, दरम्यानचे कालावधीत शासनाकडून सदरहू दुहेरी पाईप लाईन योजनेचे निधी प्राप्त झालेस फेज १ व फेज २ चे संपूर्ण रक्कम रुपये ६९२/- कोटीचे कामाच्या अनुषंगाने सक्षम मान्यतेने तात्काळ कार्यवाही ठेवणेस्तव मा. आयुक्त यांचे दिनांक १३-१-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदर प्रकरणी दरम्यानचे कालावधीत मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडून अमृत - २०१८/प्र.क्र.१७३/नवि-३३, दिनांक १३ एप्रील २०१७ ने सोलापूर शहर पाणी पुरवठयाकरिता अमृत योजनेअंतर्गत उजनी ते सोलापूर समांतर योजनेसाठी र.रुपये ४३९.१४ कोटीचे योजनेस मान्यता दिली असून, त्या अंतर्गत उजनी येथे जॅकवेल बांधणे, पंपींग मशिनरी बसविणे, उजनी ते पाकणी ते सोरेगांव पर्यंत पाईप लाईन टाकणे, पाकणी येथे ४० एमएलडी व सोरेगांव येथे ७५ एमएलडी क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे, योजनेच्या अनुषंगाने हायवे, रेल्वे क्रासिंग करणे, एनटीपीसी प्रकल्प बाधीत तीन गावांसाठी पाणीपुरवठा योजना राबविणे इत्यादी कामाचा समावेश करणेत आलेला आहे. सदरहू योजनेअंतर्गत मा. शासनाकडून अमृत योजनेअंतर्गत अनुक्रमे केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या योजनेचे हिस्स्याअंतर्गत एकूण र.रु. ३००/- कोटी व राहिलेले र.रु. १३९.१४ कोटी एनटीपीसीकडून मनपास उपलब्ध होणा-या र.रु. २५०/- कोटीतून घेणेस मा. शासनाने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार मा. शासनाकडून उजनी ते सोलापूर समांतर पाईप लाईनसाठी मंजूर करण्यात आलेल्या उपरोक्त र.रु. ४३९.१४ कोटीचे योजनेस मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता देणेत येत आहे.

सदरहू योजनेअंतर्गत उजनी धरणातून जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत पाणी येणार असून, सदरचे पाणी शहरात आणणेसाठी मुख्य पाईपलाईन टाकणे, दोन एमबीआर बांधणे, व शहरात आवश्यकतेनुसार टाक्या बांधणे व वितरण व्यवस्था तयार करणे कामाचा प्रस्ताव तात्काळ एमजीपी कडून तयार करुन शासनाकडे सादर करणेस यासाठी येणारे खर्चास व सदरचे येणारे खर्चापोटी एनटीपीसीकडून राहिलेले र.रु. ११०.८६ कोटी व राहिलेली रक्कम मा. शासनाकडून उपलब्ध करुन घेणेस, त्याअनुषंगाने मा. शासन स्तरावर पत्रव्यवहार करणे, आवश्यकतेनुसार शासनाकडील मुनफ्रा अथवा इतर शासनामान्य संस्थेकडून कर्ज घेणेस व त्याअनुषंगाने सर्व कार्यवाही ठेवणेस मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे. सदरहू मंजूर योजनेअंतर्गत एनटीपीसी प्रकल्प बाधीत तीन गावांसाठी पाणीपुरवठा योजना राबविणेत येणार आहे. तथापि सदरहू योजना पूर्ण झालेनंतर योजनेतून पाणीपुरवठा संबंधित गावास करणेच्या अनुषंगाने जिल्हा परिषद सोलापूर यांचे समवेत आवश्यक ते करारपत्र करणेची कार्यवाही मा. आयुक्त यांनी करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**ब)** सदरहू योजनेअंतर्गत आलेले पाणी शहरात व्यवस्थीतरित्या वितरीत करणेच्या अनुषंगाने यापूर्वी मनपाने शासनाकडे सादर केलेल्या र.रु. १२४०/- कोटीचे योजनेतील वितरण व्यवस्थेच्या बाबी अंतर्गत आवश्यक एमबीआर बांधणे, पाण्याच्या टाक्या बांधणे, फिडींग मेन पाईप लाईन (मुख्य पाईप लाईन) टाकणे व नव्याने बांधण्यात येणा-या टाक्याचे वितरण व्यवस्थेसाठी पाईप लाईन टाकणे इत्यादी कामाचा सविस्तर प्रस्ताव (डी.पी.आर.) तयार करुन मा. सर्वसाधारण सभेकडे सादर करणेसही मान्यता देणेत येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६२..ठ. क्र......२०
दि..१०/०४/१९...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड वरील सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या नवीन दवाखान्यास होटगी मठाचे मठाधिपती **श्री. ष.ब्र. १०८ तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महाराज दवाखाना** असे नामकरण करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 963 ठ. क्र. 29
दि. 21/04/19 रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर प्र.क्र. १० येथील मुद्रा सनसिटी येथे बांधण्यात आलेल्या दवाखान्यास होटगी मठाचे मठाध्यक्ष **श्री.ष.ब्र.१०८ तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महाराज दवाखाना** असे नामकरण करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १२८ ठ. क्र. २२ दि. ९.१०.१८.१९ रोजी ठेवला असता झालेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१६४

सोलापूर शहरातील हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, किसन सारडा व कुर्बान हुसेन या चार हुतात्म्यांना ब्रिटीशांनी दि. १२ जानेवारी १९३१ रोजी सोलापूरमध्ये फाशी दिली. या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे सोलापूर शहराला हुतात्मा नगरी म्हणून ओळखले जाते. त्यांच्या स्मृतीदिना निमित्त दरवर्षी दि. १२ जानेवारी रोजी कौन्सील हॉल येथील मा. महापौर कक्षात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 954 ठ. क्र........23
दि. 9.1.14/19 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



स्वामी विवेकानंद हे थोर भारतीय संत व नेते होतें. स्वामी विवेकानंदानी सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक व आर्थिक अशा सर्वच बाबतीत भारतीय समाज मनाचा अभ्यास करुन राष्ट्रोन्नत्तीच्या दृष्टीने मौलिक विचार मांडलेले आहेत. आजच्या युवकांना स्वामी विवेकांनंदाचे तत्वज्ञान प्रेरणादायी असेच आहे. त्यांची जयंती देशभर युवादिन म्हणून साजरी केली जाते. तरी स्वामी विवेकानंदाच्या जयंतीनिमित्त दि. १२ जानेवारी रोजी कौन्सील हॉल येथील मा. महापौर कक्षात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे [illegible] १९९८. क्र. 28
दि. 9/01/98 रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



आजच्या धकाधकीच्या व धावपळीच्या युगात आरोग्य सांभाळणे ही लोकांची तारेवरची कसरत झाली आहे. धावपळीच्या व स्पर्धात्मक वातावरणामुळे ताणतणाव निर्माण होऊन डायबिटीज, ब्लड प्रेशर व इतर विकार माणसामध्ये वाढत आहेत. अशा परिस्थितीमध्ये योगासन व प्राणायम करुन जीवन निरोगी व निरामय होण्यासाठी योगगुरु रामदेव बाबा यांनी संपूर्ण देशामध्ये व जगामध्ये योगासन व प्राणायम जीवनशैलीचा प्रचार व प्रसार केला आहे. त्यांच्या या कार्यामुळे भारत देश निरोगी व बलवान होण्यास मदत झाली आहेच याशिवाय भारतीय योग संस्कृतीचा प्रचार व प्रसार जगभर झाला असून जगातील बहुतेक देश आता योगविद्या योगसाधनेचा लाभ घेऊ लागले आहेत. सामान्य माणसाला कोणत्याही औषधविना सुदृढ व निरोगी करण्याची ताकद योगासन व प्राणायम मध्ये असल्याचे बाबा रामदेव यांनी सिध्द केले आहे. अशा या आध्यात्म व योगगुरु बाबारामदेव यांच्या कार्याचा गौरव करण्याचे दृष्टीने योगगुरु बाबा रामदेव यांना सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने मानपत्र देऊन सत्कार करण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ९६८ ठ. क्र. २५
दि. ११/०१/१९ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



घनकचरा व्यवस्थापन विभागाअंतर्गत कचरा उचलणे करिता ८ JCB व १६ डम्पर भाडयाने लावणेबाबत प्रस्तावात नमूद क ारणास्तव आजला मनपाने मक्तेदारामार्फत कचरा उचलणे बंद केल्याने व म.न.पा.कडील रिफ्युज कॉम्पॅक्टर हे काही तांत्रिक त्रुटीमुळे पूर्ण क्षमतेने काम करु शकत नसल्यामुळे कचरा उचलण्याचे काम तातडीने करणे गरजेचे असल्याने ६७ (३) (क) अंतर्गत एम.एस.मुधोळकर यांचेकडून ८ JCB व १६ डम्पर भाडयाने घेऊन येणारे अंदाजे १३.२५ लाख खर्चास व येणारा खर्च घनकचरा व्यवस्थापन तत्सम उपाय योजना या सदरी टाकणेस व सदरचे काम तातडीची गरज असल्याने ६७ (३) (क) अंतर्गत केलेबाबतची माहिती मा.स्थायी समिती व मा. म.न.पा.सभा यांचेकडे माहितीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १६-९-१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली. मा.म.न.पा.सभेकडे माहितीस्तव सादर करणेकामी शिफारस करणेत येत आहे. सोलापूर शहर स्वच्छ, सुंदर व स्मार्ट शहर बनण्याच्यादृष्टीने घनकचरा व्यवस्थापन अत्यावश्यक बाब असून त्याबाबतीत प्रशासनाचे प्रमुख म्हणून मा. आयुक्त यांनी वेळोवेळी घेतलेला निर्णय आवश्यकच वाटतात. प्रकरणी मा. स्थायी समिती ठराव क्र. २१९, दि. १२-१-१८ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ९६ ठ. क्र......२६
दि..९/०८/१८...रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत असलेल्या घंटागाडीस ओला कचरा व सुका कचरा असे पार्टीशन करुन घेणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरचे काम तातडीने करुन घेणे आवश्यक असल्याने मा. शासनाच्या आदेशानुसार स्वच्छ सर्व्हेक्षण अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेचे गुणानुक्रम वाढविणेकामी घंटागाडी मध्ये ओला कचरा व सुका कचरा असे वर्गीकरण करणेसाठी मक्तेदार प्रगती स्टील फॅब्रीकेशन व फायबर्स यांचेकडून लोखंडी पार्टीशन करणे व लोखंडी झाकण करणे, गाडीवर ऑईल पेंटने माहिती फलक रंगविणे याकरिता एका घंटागाडीस र.रु. ९७९४/- (GSTसह) याप्रमाणे एकूण ३५ गाडया करिता र.रु. ३,४२,७९०/- इतक्या खर्चास, जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथील होण्याच्या दृष्टीकोनातून ६७ (३) (क) अंतर्गत काम करुन घेणेस, व सदर केलेल्या कामाची माहिती मा. स्थायी समिती व मा.म.न.पा.समितीकडे माहितीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २१-११-१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा.स्था.स.ठ.क्र.२०६, दि. २२-१२-१७ ने अवलोकन करुन, घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत असलेल्या घंटागाडयांची संख्या किती ? असलेल्या एकूण गाडयापैकी फक्त ३५ गाडया घंटागाडयांनाच अशा पध्दतीचे पार्टीशन करण्याचे कारण काय ? आणि सदर ३५ गाडया हया कोणकोणत्या विभागातून सदरचा ओला कचरा व सुका कचरा गोळा करणार आहे, याबाबत सविस्तर माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस, मान्यता देणेत येत आहे असा ठराव पारित केलेला आहे. त्यास अनुसरुन प्रस्तावात सादर केलेल्या कामाची माहिती मा. स्थायी समिती व मा.म.न.पा.समितीकडे माहितीस्तव फेर सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १५-१-१८ चे टिपणीने आलेल्याची माहिती घेतली. मा.म.न.पा.सभेकडे माहितीस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. २३५, दि. २५-१-१८ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६०७ ठ. क्र. २०
दि. १६/४/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ४ वडर गल्ली बाळीवेस येथील पाणीपुरवठा सुधारणा करणेकरिता जोडणी करुन पाण्याचे पाईप लाईन घालणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामास येणारा खर्च र.रु ६,२३,१००/- इतकी बजेट तरतूद सन २०१७-१८ चे अंदापत्रकातील भांडवली कामे पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे या बजेट सदरातून उपलब्ध होऊन मिळणेस्तव व सदरचे पूर्वगणनपत्रास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २०-१२-१७ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ९७०९ ठ. क्र. २८
दि. १६/४/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



दि.२१/१/२०१८ पासून सोलापूर शहराचा पाणीपुरवठा चार दिवसाआड करणेकामी करणेत येणा-या कार्यवाही बाबतचा अहवाल मा. सर्वसाधारण सभेपुढं कार्योत्तर माहितीस्तव ठेवणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १८-१-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

